# करू मैत्री मराठीशी

## इयत्ता पहिली

विनामूल्य वितरणासाठी



• **खालील चित्रांमध्ये योग्य रंग भर.**







• **टेली–मानस कार्यक्रम**

Tele
MANAS
National Tele Mental Health Programme
14416

Tele-MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States) ( १४४१६ / १८०० - ८९ - १४४१६ )

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत ‘टेली–मानस’ ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२पासून राबवण्यात येत आहे. टेली–मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन नंबर १४४१६द्वारे मोफत २४ x ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली–मानस हेल्पलाईनवर कॉल केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णत: गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी नि:संकोचपणे आपल्या समस्या व शंका सदर हेल्पलाईन नंबरवर फोन करून सांगाव्यात आणि त्याविषयी मार्गदर्शन मिळवावे. या सुविधेची इतरांनाही मदत घेण्यास सांगावे.

केंद्र शासनाद्वारे टेली–मानस ॲप सुरू करण्यात आले असून ते मराठी भाषेमध्ये सुद्धा उपलब्ध आहे. या ॲपवर मानसिक आरोग्याबाबत परिपूर्ण माहिती दिलेली आहे. टेली–मानस ॲप (Tele–MANAS) हे नि:शुल्क उपलब्ध करण्यात आले आहे.

सदर पाठ्यपुस्तक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार तयार करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत या पाठ्यपुस्तकाची पडताळणी करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १६.०४.२०२५ रोजीच्या सभेमध्ये हे पाठ्यपुस्तक शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ पासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



समग्र शिक्षा

# करू मैत्री मराठीशी

## इयत्ता पहिली

(हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्श्राव्य स्वरूपातील अध्ययन–अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२५

पुनर्मुद्रण : २०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती**

**श्री. एकनाथ आव्हाड, अध्यक्ष**

डॉ. लता घोलप, सदस्य

श्रीमती राधिका पवार, सदस्य

श्रीमती मीरा परोडवाड, सदस्य

डॉ. चित्रा गवारे, सदस्य

श्रीमती नेहा लगड, सदस्य

श्रीमती प्रणिता लवटे, सदस्य

श्रीमती ज्योती वालझाडे, सदस्य

श्री. नारायण शिंदे, सदस्य

श्री. देवीदास गोसावी, सदस्य

डॉ. संतोषकुमार राठोड, सदस्य

श्रीमती सविता वायळ, सदस्य सचिव

**निर्मिती**

**श्रीमती मिताली म. शितप**

प्र. मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. संदीप आजगांवकर**

निर्मिती अधिकारी

संयोजन : **श्रीमती सविता अनिल वायळ**

विशेषाधिकारी, मराठी

चित्रकार : मयुरा डफळ, भटू बागले, यशवंत देशमुख

मुखपृष्ठ : रेश्मा बर्वे

अक्षरजुळणी : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

कागद : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

मुद्रणादेश : N/PB/2026-27/

मुद्रक : M/s

प्रकाशक

**श्री. हेमंत बाबर**

प्र. नियंत्रक

पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,

प्रभादेवी, मुंबई - २५.

# भारताचे संविधान

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## भारताचे संविधान

**भाग ४ क**

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

बाल मित्रमैत्रिणींनो,

तुम्ही या वर्षी इयत्ता पहिलीत आलात. तुमचे मनापासून स्वागत. ‘करू मैत्री मराठीशी’ इयत्ता पहिली हे मराठीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना खूप आनंद होत आहे.

इयत्ता पहिलीत येण्यापूर्वी तुमच्या परिसरातील विविध व्यक्तींकडून, मित्रमैत्रिणींकडून मराठी भाषेतील संवाद तुम्ही ऐकले असतील. आता इयत्ता पहिलीच्या पाठ्यपुस्तकात दिलेले संवाद, गाणी, गोष्टी, चित्रकथा यांद्वारे तुम्हांला मराठी भाषा समजून घ्यायची आहे. समजून घेतलेल्या शब्दांचा व संवादांचा दैनंदिन व्यवहारात उपयोग करायचा आहे.

पाठ्यपुस्तकातून सचित्र स्वरूपात दिलेल्या वेगवेगळ्या संवादांतून तुम्हांला मराठी शब्दांची ओळख होणार आहे. हे शब्द समजून घेऊन ते कोठे वापरायचे, कसे वापरायचे याची तुम्हांला माहिती होणार आहे. दररोजच्या विविध प्रसंगांत पाठ्यपुस्तकातील शब्द वापरून तुम्ही संवाद साधू शकणार आहात.

या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला चित्रवर्णन, गाणी, गोष्टी, चित्रकथा, संवाद यांसारख्या विविध गोष्टी नव्याने शिकायला मिळणार आहेत. तुम्हांला मराठी भाषा चांगल्या रीतीने ऐकून घेऊन समजावी व चांगल्या प्रकारे बोलता यावी या दृष्टीने या पाठ्यपुस्तकाची नक्कीच मदत होणार आहे. तुमचे भाषाशिक्षण आनंददायी व रंजक होण्यासाठी या पाठ्यपुस्तकात आशयानुरूप आकर्षक व बोलकी चित्रे देण्यात आलेली आहेत.

या पाठ्यपुस्तकात सहा गाणी आहेत. ही सर्व गाणी तुम्हांला साभिनय व तालासुरात म्हणता येणार आहेत. ही गाणी म्हणताना तुम्हांला खूप मजा येईल. गोष्टी ऐकताना व सांगताना तुम्ही नक्कीच त्यात रमून जाल. पाठ्यपुस्तकातील चित्रे पाहताना तुम्ही त्यातील प्रसंगांमध्ये एकरूप होऊन त्यावर भरपूर गप्पा माराल व चर्चा कराल.

पहिल्या वर्षाच्या शेवटी तुम्ही मराठी भाषेतून नक्कीच बोलू शकणार आहात. बाल मित्रमैत्रिणींनो आनंदाने मराठी शिका, यासाठी तुम्हा सर्वांना मनापासून खूप खूप शुभेच्छा!

**(अनुराधा ओक)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
**दिनांक :** ६ जुलै २०२५
**भारतीय सौर :** १६ आषाढ १९४७

**इयत्ता पहिली**
**हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता**

| प्रचलित अभ्यासक्रमातील मराठी भाषेकरिता निश्चित करण्यात आलेली उद्दिष्टे | पृष्ठ क्र. |
|---|---|
| (१) सूचना ऐकून व ओळखून त्याप्रमाणे कृती करणे. | १, ६, ७ |
| (२) योग्य उच्चारांसह गाणी म्हणणे. | ५,१०, १३, १७, २१, २८ |
| (३) चित्रांच्या साहाय्याने गोष्ट सांगणे | २३, २६, २७ |
| (४) मराठी शिष्टाचार पाळणे. | १, २, ६, ८, ११, १४, १५, १६, १९, २०, २२, २३ |
| (५) स्वत:बद्दल आणि कुटुंबीयांबद्दल माहिती सांगणे. | २, ३, ४, ८, १२, १५, १६, २४, २५ |
| (६) ध्वनी-भेद लक्षात घेऊन उच्चारण करणे. | १ ते २८ |
| (७) सुमारे २५ दृक् शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे. | १ ते २८ |
| (८) सुमारे ५०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती विकसित करणे. | १ ते २८ |
| (९) सुमारे १५० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती विकसित करणे. | १ ते २८ |

- **अध्यापनाद्वारे विद्यार्थ्यांकडून वर दिल्याप्रमाणे किमान उद्दिष्टे साध्य करून घेणे अनिवार्य आहे. उद्दिष्टांच्या समोर दिलेल्या पृष्ठक्रमांकाच्या व्यतिरिक्त इतर पृष्ठक्रमांकांवर दिलेल्या आशयाद्वारे देखील इतर उद्दिष्टे साध्य होऊ शकतात, असा प्रयत्न शिक्षकांनी करावा.**

## पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेली प्रतीके



**बघ.**



**ऐक व म्हण.**



**म्हण.**



**ऐक.**



**कृती कर.**

# अनुक्रमणिका

## भाग – १


| | | |
|---|---|---|
| १. | शाळेचा पहिला दिवस | १ |
| २. | माझी ओळख | २ |
| ३. | माझे कुटुंब | ३ |
| ४. | माझे अवयव | ४ |
| ५. | मोर (गाणे) | ५ |
| ६. | वर्गातील संवाद | ६ |
| ७. | माझी कृती | ७ |
| ८. | माझे मित्र | ८ |
| ९. | घरातील कृती | ९ |
| १०. | पक्ष्यांचे आवाज (गाणे) | १० |
| ११. | शालेय साहित्याचे दुकान | ११ |
| १२. | आमचे खेळ | १२ |
| १३. | रंगांचे गाणे (गाणे) | १३ |
| १४. | मदत | १४ |


## भाग – २


| | | |
|---|---|---|
| १५. | सिंहाचा वाढदिवस | १५ |
| १६. | माझी आवड | १६ |
| १७. | चवीने खाऊ (गाणे) | १७ |
| १८. | बसस्थानक | १८ |
| १९. | भाजीमंडई | १९ |
| २०. | मदतनीस | २० |
| २१. | ढोल वाजे (गाणे) | २१ |
| २२. | सायकल | २२ |
| २३. | सिंह आणि उंदीर (चित्रकथा) | २३ |
| २४. | माझी शाळा | २४ |
| २५. | माझा डबा | २५ |
| २६. | टोपीवाला व माकडे (चित्रकथा) | २६ |
| २७. | फुले (गाणे) | २८ |
| • | शिक्षक व पालकांसाठी सूचना | २९ |
| • | दिशा अध्ययन–अध्यापनाची | ३०–३६ |




# १. शाळेचा पहिला दिवस

भाग–१

चित्र बघ. ऐक. म्हण व कृती कर.






# २. माझी ओळख

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.



# ३. माझे कुटुंब

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.


















# ४. माझे अवयव

चित्र बघ. ओळख. ऐक व म्हण.









# ५. मोर

ऐक व म्हण.

मोरा रे मोरा
नाचून घे,
आभाळ आले
पाहून घे.

पाऊस आला
सर सर सर,
गारा वेचू
भर भर भर.



# ६. वर्गातील संवाद

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.



# ७. माझी कृती

चित्र बघ. ऐक व कृती कर.



# ८. माझे मित्र

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.






# ९. घरातील कृती

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.



# १०. पक्ष्यांचे आवाज

ऐक व म्हण.

कावळा करतो,
काव काव.
चिमणी करते,
चिव चिव.
कोकीळ करतो,
कुहू कुहू.
कोंबडा करतो,
कुकुचकू.



ऐक व म्हण.

हा कावळा आहे.

हा कोकीळ आहे.

हा कोंबडा आहे.

ही चिमणी आहे.

विनामूल्य वितरणासाठी

# ११. शालेय साहित्याचे दुकान

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.



# १२. आमचे खेळ

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.









# १३. रंगांचे गाणे

ऐक व म्हण.

लाल रंग चेंडूचा,
पिवळा रंग झेंडूचा.
काळा रंग कावळ्याचा,
पांढरा रंग बगळ्याचा.
हिरवा रंग पानांचा,
निळा रंग आकाशाचा.



# १४. मदत

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.






# १५. सिंहाचा वाढदिवस

भाग – २

चित्र बघ. ऐक व म्हण.



# १६. माझी आवड

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.



# १७. चवीने खाऊ

ऐक व म्हण.



कैरी, चिंच
आंबट आंबट.

कारले, मेथी
कडूच कडू.

डाळिंब, पपई
गोडच गोड.

चवीने खाऊ
पपईची फोड.

कैरी आंबट असते.

ऐक व म्हण.

डाळिंब गोड असते.

चिंच आंबट असते.

कारले कडू असते.

पपई गोड असते.

# १८. बसस्थानक

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.



# १९. भाजीमंडई

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.



# २०. मदतनीस

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.






विनामूल्य वितरणासाठी

# २१. ढोल वाजे



ऐक व म्हण.



ढोल वाजतो ढम् ढम् ढम्

डमरू वाजतो डम् डम् डम्

ताशा वाजतो तड् तड् तड्

तबला वाजतो धा धिन् धा



चित्र बघ. ऐक व म्हण.



ढम् ढम् ढम्



डम् डम् डम्



तड् तड् तड्



धा धिन् धा

# २२. सायकल

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.



# २३. सिंह आणि उंदीर



चित्र बघ. ऐक व म्हण.




















आम्ही आता मित्र झालो.

# २४. माझी शाळा

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.






# २५. माझा डबा

चित्र बघ. ऐक व म्हण. लक्षात ठेव व सराव कर.



# २६. टोपीवाला व माकडे

चित्र बघ. ऐक व म्हण.




माझ्या टोप्या द्या.
नाही देणार.
मला नकोच.
आता मी टोप्या जमा करतो.
मी जातो.

# २७. फुले



ऐक व म्हण.



माझे नाव गुलाब,
मी फुलांचा राजा.



माझे नाव मोगरा,
मी रंगाने पांढरा.

मी आहे झेंडू,
माझा रंग पिवळा.



पाहून रंगीत फुले,
दंग होतात मुले.





ऐक व म्हण.

**मला गुलाब आवडतो.**

**मला झेंडू आवडतो.**

**मला मोगरा आवडतो.**

# शिक्षक व पालकांसाठी सूचना

**सूचना :** हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली या माध्यमांच्या शाळांकरिता तयार करण्यात आलेल्या 'करू मैत्री मराठीशी' या पाठ्यपुस्तकाची रचना ही श्रवण, भाषण-संभाषण या कौशल्यांवर आधारलेली आहे. अमराठी माध्यमांतील विद्यार्थ्यांना शालेय वर्षाच्या शेवटी मराठी भाषेतून भाषण-संभाषणाचे कौशल्य आत्मसात व्हावे या दृष्टीने पाठ्यपुस्तकातील पाठ्यघटकांची रचना करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या घरातील, परिसरातील व त्यांच्या भावविश्वातील विविध घटक व प्रसंग डोळ्यांसमोर ठेवून संवाद तयार करण्यात आलेले आहेत. शालेय वर्षाच्या शेवटी या घटकांशी संबंधित मराठी भाषेतील शब्द विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने व अचूकपणे बोलता यावेत या दृष्टीने शिक्षकांनी प्रयत्न करावेत. अमराठी माध्यमांसाठी तयार करण्यात आलेल्या या पाठ्यपुस्तकातील घटकांचे अध्यापन करत असताना शिक्षकांनी पुढील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

- शिक्षकांनी प्रत्येक पाठाचे दैनंदिन नियोजन करावे. दररोज पाठातील नवीन शब्द व वाक्ये विद्यार्थ्यांना शिकवावीत. त्यांचा सराव करून घ्यावा. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना शिकवलेला भाग पूर्ण येईपर्यंत सराव घ्यावा. त्यानंतरच पुढील भाग शिकवण्यास सुरुवात करावी.
- प्रत्येक पाठातील घटकांची विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी सांगड घालून विद्यार्थ्यांना बोलते करावे.
- प्रत्येक पाठातील नवीन शब्द, संवाद हे स्पष्ट उच्चारणांसह ऐकवावेत.
- विद्यार्थ्यांनी ऐकलेले शब्द मागे म्हणण्यास सांगून त्यांचा वारंवार सराव करून घ्यावा.
- पाठातील औपचारिक व अनौपचारिक संवाद यांचा वापर प्रत्यक्ष दैनंदिन जीवनात करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
- प्रत्येक नवीन पाठ सुरू करत असताना विद्यार्थ्यांकडून पूर्वी शिकवलेल्या पाठांतील विविध शब्द, वाक्ये, संवाद यांचा संपूर्ण वर्षभर सराव करून घ्यावा.
- पाठांमधील सूचना ऐकून व त्यांचा अर्थ ओळखून विद्यार्थ्यांकडून कृती करून घ्याव्यात.
- पाठ्यपुस्तकामध्ये समाविष्ट करण्यात आलेली गाणी योग्य उच्चारांसह, आरोह व अवरोहासह तसेच साभिनय म्हणून घ्यावीत.
- पाठांमध्ये आलेले विविध शिष्टाचार पाळण्यासंबंधी विद्यार्थ्यांना सूचना द्याव्यात. तसेच सदर शिष्टाचार पाळण्यासंबंधी वेळोवेळी मार्गदर्शन करावे.
- शब्दांमधील ध्वनिभेद लक्षात घेऊन विद्यार्थी उच्चारण करतात का? याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.
- विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात मराठीतून संवाद साधण्यासंदर्भात वर्गामध्ये विविध कृती करून घ्याव्यात.
- विद्यार्थी त्यांच्या शब्दांमध्ये संवाद साधण्याचा प्रयत्न करत असतील तर त्यांना प्रोत्साहन द्यावे. तसेच त्यांना योग्य तेथे मार्गदर्शन करावे.
- पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यात आलेल्या चित्रकथेतील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रकथेतील चित्रे व प्रसंग यांबाबत त्यांना उत्स्फूर्तपणे बोलण्यासाठी प्रेरित करावे.

## दिशा अध्ययन-अध्यापनाची

**प्रत्येक पाठाखाली दिलेल्या कृती क्रमाने घ्याव्यात. याशिवाय आपल्या कल्पकतेने काही कृती वैयक्तिक तसेच गटागटांत घेता येतील.**

### १. शाळेचा पहिला दिवस

(१) विद्यार्थ्यांना सुरुवातीला पाठ्यपुस्तक हाताळण्यास द्यावे. संपूर्ण पाठ्यपुस्तकाचे पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत निरीक्षण करून घ्यावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. अभिवादनाचे शब्द कोठे कोठे वापरले जातात हे सांगावे.

(३) विद्यार्थ्यांकडून नमस्ते गुरुजी, नमस्ते बाई यांसारख्या अभिवादन कृतींचा सराव करून घ्यावा.

(४) कृपया, धन्यवाद यांसारख्या शब्दांचे उच्चारण करून घ्यावे. हे शब्द योग्य ठिकाणी वापरण्याचा वर्गात सराव करून घ्यावा. विद्यार्थी वर्गात अभिवादनाचे शब्द योग्य त्या ठिकाणी वापरतात का? याचे निरीक्षण करावे.

(५) पाठातील संवादांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा. तसेच कुटुंबातील आजी, आजोबा, मामा, मामी, काका, काकी यांची नावे घेऊन अभिवादन कृतींचा सराव करून घ्यावा.

### २. माझी ओळख

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांत घडत असलेल्या प्रसंगाचे त्यांच्या शब्दांत वर्णन करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील संवाद ऐकवावेत. ऐकलेले संवाद मागे म्हणण्यास सांगावेत.

उदा. नमस्ते, माझे नाव मीरा आहे.
नमस्ते, माझे नाव साहिल आहे.

(३) विद्यार्थ्यांना पाठातील संवादांच्या आधारे त्यांची ओळख करून देण्यास सांगावी.

(४) विद्यार्थ्यांचे गट करावेत. गटांमध्ये आपापल्या मित्रमैत्रिणींचे नाव सांगून एकमेकांची ओळख करून देण्यास सांगावे.

(५) पाठातील या कृतींचा व संवादांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

### ३. माझे कुटुंब

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांमध्ये घडणाऱ्या कृतींबाबत चर्चा करावी.

(२) पाठामधील नेहा आपल्या कुटुंबाची ओळख करून देत आहे. त्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला आपापल्या कुटुंबातील व्यक्तींची ओळख करून देण्यास सांगावी.

(३) पाठातील संवादांचा विद्यार्थ्यांकडून सराव करून घ्यावा.

उदा. हे माझे बाबा आहेत.
ही माझी आई आहे.
ही माझी ताई आहे.

(४) विद्यार्थ्यांना आजी, आजोबा, काका, काकी हे चित्रशब्द दाखवून यांवर आधारित विविध वाक्ये म्हणून घ्यावीत.

(५) विद्यार्थ्यांना कुटुंबातील व्यक्तींबद्दल विविध प्रश्न विचारावेत.

उदा. तुझ्या कुटुंबात कोण कोण आहेत?
तुझी ताई काय करते?

या प्रकारे विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून मराठीमध्ये उत्तर देण्याकरिता मार्गदर्शन करावे.

### ४. माझे अवयव

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांतील कृतींची ओळख करून द्यावी. चित्रांतील कृतींमध्ये काय दाखवले आहे याबद्दल विविध प्रश्न विचारावेत.

(२) पाठातील चित्रांमध्ये दाखवल्याप्रमाणे विविध अवयवांची ओळख करून द्यावी.

उदा. हा माझा **कान** आहे.

हे माझे **कान** आहेत.

वरीलप्रमाणे पाठातील सर्व वाक्ये विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावीत.

(३) कान, डोळा, हात, पाय, नाक या अवयवांच्या नावांची ओळख करून द्यावी.

(४) कान, डोळा, हात, पाय, नाक यांप्रमाणे इतर अवयवांची प्रत्यक्ष ओळख करून द्यावी. उदा. डोके, जीभ, पाठ, पोट, बोटे, तोंड, दात इत्यादी.

(५) एक कान व दोन कान यांसाठी वापरले जाणारे हा कान व हे कान या शब्दांची ओळख करून द्यावी. त्यातील फरक सांगावा. वरीलप्रमाणे हा, ही, हे या शब्दांचा वापर करून अवयवांची ओळख करून देण्यास सांगावी.

## ५. मोर

(१) शिक्षकांनी गाणे तालासुरात साभिनय म्हणावे.

(२) गाण्यातील चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(३) गाण्यातील शब्द व चित्र ओळखण्यास सांगावे. उदा. मोर, घर, पाऊस, ढग, डोंगर, वीज, झाड, गारा इत्यादी.

(४) विद्यार्थ्यांना ओळखता न आल्यास या शब्दांची चित्रे स्वत: दाखवावीत.

(५) गाण्यातील सर सर सर तसेच भर भर भर या शब्दांशी संबंधित कृती करून दाखवाव्यात. विद्यार्थ्यांकडून या शब्दांसाठीच्या कृती करून घ्याव्यात. तसेच या शब्दांचे उच्चार करून घ्यावेत.

(६) गाण्याची एकेक ओळ तालासुरात साभिनय म्हणून दाखवावी.

(७) विद्यार्थ्यांना गाण्याच्या ओळी मागे म्हणण्यास सांगावे.

(८) विद्यार्थ्यांकडून गाणे वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात म्हणून घ्यावे.

## ६. वर्गातील संवाद

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) पाठातील चित्रांमध्ये घडणाऱ्या प्रसंगाचे वर्णन विद्यार्थ्यांना करण्यास सांगावे.

(३) विद्यार्थ्यांना पाठातील प्रत्येक संवाद ऐकवावेत. तसेच त्यांच्याकडून संवाद म्हणून घ्यावेत.

(४) विद्यार्थ्यांकडून संवाद पुन्हा पुन्हा म्हणून घ्यावेत. संवादाच्या दृढीकरणासाठी नियमित सराव करून घ्यावा.

(५) संवाद सादर करताना हावभावांचा, कृतींचा वापर करावा. विद्यार्थी संवाद सादर करताना हावभावांचा, कृतींचा वापर करतात का, याकडे लक्ष द्यावे.

(६) 'दे' व 'घे' या कृती समजावून सांगाव्यात. पेन, पुस्तक, पेन्सिल, रबर, पट्टी, पाटी, रंग या शब्दांचा वापर करून संवाद सादरीकरण करून घ्यावे.

(७) वर्गात येण्यापूर्वी व वर्गातून बाहेर जाण्यापूर्वी शिक्षकांसमवेत बोलत असताना वापरावयाच्या शिष्टाचारांची ओळख करून द्यावी.

(८) मित्रांसमवेत वस्तूंची देवाणघेवाण करत असताना 'कृपया' व 'धन्यवाद' या शब्दांच्या वापराबद्दलची माहिती द्यावी.

## ७. माझी कृती

(१) विद्यार्थ्यांना पाठामधील चित्रांतील कृतींचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांतील विद्यार्थी जी कृती करत आहे ती करण्यास सांगावी. त्या कृतीचे नाव सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील कृतीसाठी वापरण्यात आलेली सूचना ऐकवावी व त्याप्रमाणे कृती करण्यास सांगावे.

(३) पाठातील विविध कृती वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात करून घ्याव्यात.

(४) विद्यार्थ्यांना पाठात दिलेल्या कृतींप्रमाणे झोप, उडी मार, टाळी वाजव, डोळे बंद कर, डोळे उघड यांसारख्या विविध कृती स्वत: करून

दाखवाव्यात. सदर कृतींची नावे सांगावीत तसेच या कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्याव्यात.

## ८. माझे मित्र

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) पाठातील संवाद विद्यार्थ्यांना ऐकवावेत. विद्यार्थ्यांकडून संवाद मागे म्हणून घ्यावेत.

(३) परिसरातील विविध ठिकाणी घडणारे छोटे छोटे संवाद विद्यार्थ्यांना ऐकवावेत. पाठात आलेले संवाद समजून सांगावेत. तसेच पाठातील संवादाचा सराव करून घ्यावा.

(४) 'तू कसा आहेस?', 'तू कशी आहेस?' या वाक्यांप्रमाणे मोठ्या व्यक्तींसाठी 'तुम्ही कसे आहात?' अशी वाक्ये वापरण्याबद्दल माहिती द्यावी. अशा प्रकारच्या विविध प्रश्नार्थक वाक्यांचा वर्गात सराव करून घ्यावा.

(५) विद्यार्थ्यांना माहिती जाणून घेण्यासाठी प्रश्न कसे विचारले जातात हे सांगावे. तसेच प्रसंगानुरूप प्रश्नाचे बदललेले उत्तर कसे असावे ते सांगावे.

## ९. घरातील कृती

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांत कोण कोण दिसत आहे ते विचारावे.

(२) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवाद मागे म्हणून घ्यावेत.

(३) विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील विविध प्रसंगांवर आधारित संवाद ऐकवावेत.

(४) पाठातील संवादांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

(५) 'दे', 'घे' या क्रियापदांवर आधारित पाठातील वाक्ये म्हणून घ्यावीत.

जसे- **दे–** रमा वही दे.

**घे–** रमेश वही घे.

(६) 'दे', 'घे' या क्रियापदांसोबत मराठीतील इतरही विविध क्रियापदांचाही सराव करून घ्यावा.

जसे- **ये–** रमा आत ये.

**आण–** रमेश वही आण.

**ठेव–** सुहास डबा ठेव.

(७) लाडूऐवजी विविध खाद्यपदार्थांची नावे घेऊन संवाद सादरीकरण करून घ्यावे.

उदा. पोळी-भाजी, दूध, पोहे, शिरा, उपमा, थालीपीठ इत्यादी.

## १०. पक्ष्यांचे आवाज

(१) विद्यार्थ्यांना गाणे तालासुरात साभिनय ऐकवावे.

(२) गाणे तालासुरात व साभिनय म्हणण्याचा वैयक्तिक व गटात सराव करून घ्यावा.

(३) गाण्यातील पक्ष्यांच्या आवाजांच्या नकला करून दाखवाव्यात. तसेच विद्यार्थ्यांकडून करून घ्याव्यात.

(४) आवाजाची नक्कल दर्शवणारे शब्द म्हणून घ्यावेत.

**कुत्रा** – कुत्रा भोऽ भोऽ करतो.

**मांजर** – मांजर म्याँवऽ म्याँवऽ करते.

**बदक** – बदक क्वॅक् क्वॅक् करते.

(५) विद्यार्थ्यांना गाण्याव्यतिरिक्त विविध प्राणी व पक्षी यांची चित्रे दाखवावीत. विविध प्राणी व पक्षी यांच्या आवाजांची नक्कल करून दाखवावी. विद्यार्थ्यांकडून त्यांना माहीत असलेल्या विविध पक्षी व प्राणी यांच्या आवाजांची नक्कल करून घ्यावी.

(६) विद्यार्थ्यांना वाक्ये ऐकवावीत व म्हणून घ्यावीत. गाण्यातील शब्द वापरून विद्यार्थ्यांना वाक्ये तयार करण्यास सांगावे. वाक्य तयार करण्याकरिता त्यांना मदत करावी.

## ११. शालेय साहित्याचे दुकान

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांत काय काय दिसत आहे ते विचारावे.

(२) पाठातील संवाद विद्यार्थ्यांना ऐकवावेत. विद्यार्थ्यांकडून संवाद म्हणून घ्यावेत.

(३) पाठातील संवादाचे नाट्यीकरण करून घ्यावे.

(४) वर्गात पेनऐवजी पेन्सिल, पुस्तक, वही, रबर, पट्टी, पाटी, कंपासपेटी, तेलखडू इत्यादी चित्रशब्दांची ओळख करून द्यावी. या शब्दांचा वापर करून संवाद सादरीकरण करून घ्यावे.

(५) दृढीकरणासाठी पाठातील संवादांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

(६) दहा रुपये, वीस रुपये, पन्नास रुपये, शंभर रुपये यांच्या प्रत्यक्ष नोटा दाखवून ओळख करून द्यावी. संवादात या शब्दांचा योग्य वापर करून घ्यावा.

(७) दररोजच्या वापरामध्ये 'धन्यवाद' या शिष्टाचाराचा वापर करण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.

## १२. आमचे खेळ

(१) पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) पाठातील चित्रांतील संवाद ऐकवावेत. तसेच पाठामधील संवाद म्हणून घ्यावेत.

(३) खेळाच्या आवडीबाबत चर्चा करावी. विविध खेळांची नावे सांगावीत.

(४) खेळात वापरल्या जाणाऱ्या इतर वस्तू दाखवून त्यांच्या नावांची ओळख करून द्यावी.

(५) विद्यार्थ्यांना खेळांच्या आवडीनिवडीबाबत प्रश्न विचारावेत. त्याप्रमाणे खेळांच्या नावांचे उच्चार करून घ्यावेत.

(६) एखादी वस्तू घेण्यासाठी पूर्वपरवानगी घ्यावी ही बाब विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावी.

## १३. रंगांचे गाणे

(१) विद्यार्थ्यांना गाणे तालासुरात साभिनय ऐकवावे.

(२) गाण्यातील रंग व वस्तू यांची सर्व नावे सांगून ओळख करून द्यावी.

(३) विद्यार्थ्यांना चित्र व रंग दाखवून उच्चारण करून घ्यावे.

(४) विद्यार्थ्यांना पुढील वाक्ये ऐकवावीत व म्हणून घ्यावीत.

जसे- चेंडू लाल आहे.
झेंडू पिवळा आहे.
बगळा पांढरा आहे.

(५) विद्यार्थ्यांकडून गाणे वैयक्तिक व सामूहिक स्वरूपात साभिनय म्हणून घ्यावे.

(६) विद्यार्थ्यांना रंगांच्या आवडीबाबत संवाद ऐकवावेत. तसेच संवाद म्हणून घ्यावेत.

(७) विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडत्या रंगाबाबत माहिती विचारावी. त्यांना आवडणाऱ्या रंगाबाबत व्यक्त होण्याची संधी द्यावी.

## १४. मदत

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील चित्र व त्यावर आधारित संवाद म्हणून दाखवावेत.

(३) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादाचे सादरीकरण करून घ्यावे.

(४) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादांचा सराव करून घ्यावा.

(५) विद्यार्थी घरी तसेच परिसरात कोणाकोणाला मदत करतात, कोणती मदत करतात यांविषयी माहिती विचारावी.

## १५. सिंहाचा वाढदिवस

(१) विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना चित्रावर आधारित संवाद ऐकवावेत.

(३) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवाद म्हणून घ्यावेत.

(४) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादांचे सादरीकरण करून घ्यावे.

(५) विद्यार्थ्यांना चित्रातील प्राण्यांची ओळख करून द्यावी. त्यांची नावे सांगावीत. त्या प्राण्यांच्या खाद्यांविषयी माहिती सांगावी.

(६) विद्यार्थ्यांना पाठाव्यतिरिक्त इतर प्राण्यांची ओळख

करून द्यावी. उदा. प्राण्यांची नावे व खाद्यपदार्थ.

जसे- मी मांजर आहे. मी दूध पिते.

मी गाय आहे. मी गवत खाते.

(७) विद्यार्थ्यांबरोबर वाढदिवसाबद्दल गप्पा माराव्यात. तुझा वाढदिवस कधी असतो? तुझ्या वाढदिवसाला घरी कोण कोण येते? असे प्रश्न विचारावेत.

## १६. माझी आवड

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील संवाद ऐकवावेत. चित्रांतील संवाद मागे म्हणून घ्यावेत.

(३) विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या फळांची नावे वापरून संवादांचे गटात सादरीकरण करून घ्यावे.

(४) सफरचंद, केळी, चिकू, संत्री, द्राक्षे, अननस, फणस, पपई, कलिंगड, आंबे या फळांच्या नावांची ओळख चित्रांतून करून द्यावी.

(५) फळांच्या नावांचा वापर करून 'मला ....... आवडतो/आवडते/आवडतात' असा सराव करून घ्यावा.

## १७. चवीने खाऊ

(१) विद्यार्थ्यांना गाणे तालासुरात साभिनय ऐकवावे. गाणे पाठोपाठ म्हणून घ्यावे.

(२) विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व गटात गाणे तालासुरात व साभिनय म्हणण्याचा सराव करून घ्यावा.

(३) विद्यार्थ्यांना गाण्यातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. खालीलप्रमाणे सर्व चवींची ओळख करून द्यावी.

जसे- कैरी आंबट असते. चिंच आंबट असते.

कारले कडू असते. मेथी कडू असते.

डाळिंब गोड असते. पपई गोड असते.

(४) विद्यार्थ्यांना गाण्याव्यतिरिक्त इतर भाज्या, फळे, पदार्थ यांची नावे व त्यांची चव सांगावी. त्यांच्या नावांचे उच्चारण करून घ्यावे.

## १८. बसस्थानक

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादांचा सराव करून घ्यावा.

(३) विद्यार्थ्यांना चित्रांद्वारे बसस्थानकावरील विविध घटकांची माहिती करून द्यावी. तसेच त्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध शब्दांची ओळख करून द्यावी.

उदा. मुले, प्रवासी, लोक, तिकीट, दुकान, बस, बसचालक.

(४) विद्यार्थ्यांना पाठातील संवाद ऐकवावेत.

(५) विद्यार्थ्यांनी बसस्थानकासंबधी अनुभवलेल्या घटनांबाबत त्यांच्याशी गप्पा माराव्यात.

(६) विद्यार्थ्यांना छोटी वाक्ये बोलायला प्रेरित करावे.

उदा. काका, पुण्याला जायचे आहे.

बस किती वाजता आहे?

(७) विद्यार्थ्यांकडून बसस्थानकावरील प्रसंगांचे नाट्यीकरण करून घ्यावे.

(८) बस कधी येईल? याबाबत वेळ सांगण्यासाठी उदा. सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र या शब्दांचा वापर करण्याबाबत माहिती द्यावी.

(९) विद्यार्थ्यांकडून १ ते १२ या अंकांचा वापर करून वेळ सांगण्याबाबत संवाद तयार करून घ्यावेत.

(१०) विद्यार्थ्यांकडून विविध गावांची नावे विचारून, त्यांचा वापर करून संवादांचा सराव करून घ्यावा.

## १९. भाजीमंडई

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांवर आधारित संवाद म्हणून दाखवावेत. संवादांचे सादरीकरण करून घ्यावे.

(३) विद्यार्थ्यांकडून एक किलो, दोन किलो यांप्रमाणे मराठी अंकांचा व शब्दांचा वापर करून सराव घ्यावा.

(४) विद्यार्थ्यांना दहा रुपये, वीस रुपये दाखवून या नोटांची नावे सांगावीत. विद्यार्थ्यांना नोटांची नावे उच्चारण्यास सांगावीत.

(५) विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यवहारात पैशांच्या वापराबाबतची माहिती द्यावी.

(६) विद्यार्थ्यांकडून दे-द्या, घे-घ्या अशा शब्दांचा योग्य सराव करून घ्यावा.

## २०. मदतनीस

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील चित्र व त्यावर आधारित संवाद म्हणून दाखवावेत.

(३) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादांचे सादरीकरण करून घ्यावे.

(४) विद्यार्थ्यांना परिसरातील विविध मदतनिसांच्या नावांचा परिचय करून द्यावा. मदतनिसांच्या कामांबद्दल माहिती द्यावी.

(५) विद्यार्थ्यांना परिसरातील विविध मदतनीस पोलीस, डॉक्टर, शिक्षक, शेतकरी, पोस्टमन, सैनिक यांची चित्रकार्डांद्वारे ओळख करून द्यावी.

(६) विद्यार्थ्यांकडून पाठावर आधारित छोटे संवाद तयार करून घ्यावेत. तसेच सादरीकरण करून घ्यावे.

## २१. ढोल वाजे

(१) विद्यार्थ्यांना गाणे तालासुरात, साभिनय ऐकवावे व म्हणून घ्यावे.

(२) विद्यार्थ्यांना गाण्यातील वाद्ये वर्गात प्रत्यक्ष आणून दाखवावीत. प्रत्येक वाद्याचे आवाज ऐकवावेत.

(३) विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व गटात गाणे तालासुरात व साभिनय म्हणण्याचा सराव करून घ्यावा.

(४) विद्यार्थ्यांकडून वाद्य व त्यांचे आवाज यांच्यासाठी आलेल्या शब्दांचा सराव करून घ्यावा.

जसे- ढोल- ढम् ढम् ढम्
डमरू- डम् डम् डम्
ताशा- तड् तड् तड्
तबला- धा धिन् धा

(५) विद्यार्थ्यांना परिसरातील इतर उपलब्ध वाद्यांची नावे व ध्वनी यांची ओळख करून द्यावी.

## २२. सायकल

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांवर आधारित संवाद म्हणून दाखवावेत.

(३) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादांचे सादरीकरण करून घ्यावे.

(४) विद्यार्थ्यांना वर्गात किंवा वर्गाबाहेर इतरांकडून एखादी वस्तू मागताना 'कृपया' हा शब्द आवर्जून वापरण्यास सांगावा.

(५) विद्यार्थ्यांना वस्तू मिळाल्यानंतर 'धन्यवाद' हा शब्दही वापरण्यास सांगावा.

(६) विद्यार्थ्यांकडून दैनंदिन प्रसंगांमध्ये 'कृपया' व 'धन्यवाद' या शब्दांच्या वापराचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

## २३. सिंह आणि उंदीर

(१) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.

(२) विद्यार्थ्यांना चित्रकथा ऐकवावी व त्याबाबत गप्पा माराव्यात.

(३) विद्यार्थ्यांना सिंह, उंदीर, मदत, दया, माफ करा या शब्दांची ओळख करून द्यावी. या शब्दांचे उच्चारण करून घ्यावे.

(४) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील चित्रे दाखवून त्यांतील संवाद ऐकवावेत व म्हणून घ्यावेत.

(५) विद्यार्थ्यांना चित्रकथा उत्स्फूर्तपणे सांगण्यासाठी प्रेरित करावे.
(६) विद्यार्थ्यांना विविध चित्रकथा ऐकवाव्यात.
(७) विद्यार्थ्यांना शिष्टाचारांची ओळख करून द्यावी. उदा. नमस्ते, कृपया, धन्यवाद, माफ करा यांसारखे शब्द वर्गात नियमितपणे वापरण्याचा सराव करून घ्यावा.
(८) विद्यार्थ्यांकडून चित्रकथेचे नाट्यीकरण करून घ्यावे.

## २४. माझी शाळा

(१) विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांतील संवाद विद्यार्थ्यांकडून मागे म्हणून घ्यावेत.
(२) विद्यार्थ्यांना शाळेतील विविध वस्तूंच्या नावांचा परिचय करून द्यावा.
(३) विद्यार्थ्यांना शाळेतील विविध वस्तूंची नावे विचारावीत. विविध वस्तूंच्या नावांचा परिचय करून द्यावा.
उदा. बाक, फळा, खडू, डस्टर, खिडकी, खुर्ची, टेबल, पुस्तक, वही इत्यादी. हे सर्व शब्द घेऊन वाक्ये तयार करून म्हणून घ्यावीत.
(४) विद्यार्थ्यांना शाळा भरण्याची व शाळा सुटण्याची वेळ या संदर्भाने प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांना विचारलेली वेळ योग्य शब्दांत सांगता यावी यासाठी मार्गदर्शन करावे.

## २५. माझा डबा

(१) विद्यार्थ्यांना पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
(२) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवाद मागे म्हणून घ्यावेत.
(३) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.
(४) विद्यार्थ्यांना डब्यात आणल्या जाणाऱ्या विविध खाद्यपदार्थांची ओळख करून द्यावी.
(५) विद्यार्थ्यांकडून पाठातील संवादांचा सराव करून घ्यावा. पाठात आलेल्या शब्दांचा तसेच इतर शब्दांचा वापर करून संवाद तयार करण्यास सांगावे.
उदा. वरण-भात, पोळी-भाजी, मसालेभात, उपमा, पोहे, शिरा.

## २६. टोपीवाला व माकडे

(१) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
(२) विद्यार्थ्यांना चित्रकथेतील चित्रे दाखवून संवाद ऐकवावेत.
(३) चित्रकथेतील संवाद म्हणून घ्यावेत.
(४) विद्यार्थ्यांना चित्रकथा उत्स्फूर्तपणे सांगण्यासाठी प्रेरित करावे.
(५) विद्यार्थ्यांना विविध चित्रकथा ऐकवाव्यात.
(६) विद्यार्थ्यांकडून चित्रकथेचे सादरीकरण करून घ्यावे.
(७) विद्यार्थ्यांकडून दररोजच्या वापरातील शब्दांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

## २७. फुले

(१) विद्यार्थ्यांना गाणे तालासुरात साभिनय ऐकवावे. गाणे पाठोपाठ म्हणून घ्यावे.
(२) विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक व गटात गाणे तालासुरात व साभिनय म्हणण्याचा सराव करून घ्यावा.
(३) विद्यार्थ्यांना त्यांच्या परिचित फुलांची चित्रे दाखवून फुलांची ओळख करून द्यावी. फुलांच्या नावांचे उच्चारण करून घ्यावे.

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई–बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला **'वाईट'** वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.




हे बटण दाबा.

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.




चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास आपत्कालीन मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबविला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.

नए समाज की ओर
Towards a new dawn

- विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

करू मैत्री मराठीशी, इयत्ता पहिली
(हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु,
तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता)

(विनामूल्य वितरणासाठी)

समग्र शिक्षा
Samagra Shiksha